G.P.F. Section (Legal)

शिक्षण विभाग (माध्य.)
आवक क्र. 1138
दिनांक. 29/5/14

स्मरणपत्र क्रमांक.1

# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

( जी.पी.एफ विभाग )

क्रमांक : 85 / प्रलेविअ / जी.पी.एफ / 2014 दिनांक : 26 / 05 / 2014

## परिपत्रक

प्रति,

1) सर्व विभाग प्रमुख
महानगरपालिका, नागपूर
2) सहा. आयुक्त (सर्व झोन )
महागनगरपालिका, नागपूर

विशय:– **आपल्या विभागातून सेवानिवृत्त / मृत / ऐच्छिक सेवानिवृत्त होणा–या कर्मचा–यांची साधारण भविष्य निर्वाह निधी वर्गणीची कपात सेवानिवृत्तीचे 3 महिने अगोदर बंद करून त्याबाबतची नस्ती तयार करून अंतिम प्रदान मंजूरीसाठी जीपीएफ विभागात पाठविण्याबाबत**

संदर्भ:–1) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र भविष्य निर्वाह निधी 2005 दिनांक 1 / 2 / 2005
2) वित्त विभाग परिपत्रक क्र. 198 / परिपत्रक / 2011 / जीपीएफ दि 20 / 09 / 2011

उपरोक्त संदर्भाकिंत विषयाबाबतचे वित्त विभागाचे दिनांक 20 / 9 / 2011 चे परिपत्रक अवलोकन करावे. त्यानुसार व महाराष्ट्र सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम 7(4) प्रमाणे सेवानिवृत्त होणा–या कर्मचा–यांची भविष्य निर्वाह निधी वर्गणीची दरमहा कपात सेवानिवृत्त होण्याच्या कमीत कमी 3 महिने अगोदर बंद करून संबंधित कर्मचा–यांची नस्ती आपल्या विभागामार्फत आवश्यक कागदपत्रासह तयार करून अंतिम प्रदानाकरीता जीपीएफ विभागात पाठविण्याबाबत आपल्या विभागास कळविण्यात आले होते. **परंतू सदर प्रकरणी असे निर्देशनास आले आहे की आपल्या विभागामार्फत वित्त विभागाचे संदर्भीय परिपत्रका नुसार कार्यवाही करण्यात येत नाही.**

**करीता सर्व विभाग प्रमुख / सहा. आयुक्त (सर्व झोन) यांना कळविण्यात येते की आपल्या विभागातून सेवानिवृत्त / मृत / ऐच्छिक सेवानिवृत्त होणा–या कर्मचा–यांची भविष्य निर्वाह निधी ची दरमहा वर्गणीची कपात कमीत कमी 3 महिन्यापूर्वी बंद करून संबंधित कर्मचा–यांची नस्ती जीपीएफ विभागास पाठविण्याबाबत आपल्या अधिनस्थ देयक लिपीकांना सूचना द्याव्यात. त्याकरीता सदर परिपत्रक त्यांचे नजरेस आणून द्यावे.**

**आपल्या विभागाकडून अशा प्रकारच्या नस्ती विहीत कालावधीत प्राप्त न झाल्यास संबंधित कर्मचा–यांना वेळेवर अंतिम प्रदान न झाल्यास व त्यांनी जीपीएफ रकमेवर व्याजाची मागणी केल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी आपले विभागाची राहील याची कृपया नोंद घ्यावी.**

29.5.14

प्रमुख लेखा व वित्त अधिकारी,
महानगरपालिका, नागपूर

प्रतिलीपी,
1) मा. आयुक्त मनपा नागपूर यांना माहितीकरीता सविनय सादर
2) मा. उपायुक्त / अति. उपायुक्त (1)व (2) मनपा, नागपूर यांच्या माहिती करीता सादर
3) निगम लेखा परीक्षक, मनपा, नागपूर यांना माहिती करीता ...